# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/०७/२०२४ (शुक्रवार) सकाळ

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. मौदा** :— दि. ०७/१०/२०१९ चे ०४/१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— पियुष नंदकिशोर चरडे वय २१ वर्षे रा. सावळी ता. कामठी जिल्हा नागपुर यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मौदा येथे अप. क्र. ७२३/२०१९ कलम ३०७, ३०२, ३४२, ३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दि. ०६/१०/१९ चे २०/३० वा. दरम्यान यातील मृतक इसम नामे— आकाश उर्फ गोलू श्रावण सोनटक्के वय २५ वर्षे रा. सावळी ता. कामठी जिल्हा नागपुर हा आपल्या मैत्रिणीला भेटण्यास घरी गेला असतांना आरोपी क्र. १) गजानन चरणदास शेंडे. वय ३५ वर्षे रा. सावळी ता.कामठी जिल्हा नागपुर २) पंकज चरणदास शेंडे, वय ३६ वर्षे रा. सावळी ता. कामठी जिल्हा नागपुर ३) दिनेश धनई महतो, वय २८ वर्षे रा. सावळी ता.कामठी जिल्हा नागपुर. (मैत्रिणीचे दोन्ही काका व शेजारी) यांनी त्यास घरात बंद करून मैत्रिणी सोबत प्रेमसबंध असल्याच्या कारणावरून त्यास विटा व लाकडी बल्ल्यानी चेहऱ्यावर मारून जबर जखमी करून जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केला. मृतक हा उपचारादरम्यान मरण पावल्याने कलम ३०२ भादंवि प्रमाणे कलम वाढ करण्यात आली.

सदर प्रकरणाचे तपास पोनि मधुकर गिते यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे — ०१ देशपांडे मॅडम कोर्टामध्ये सादर केले. दिनांक ०५/०७/२०२४ रोजी मा. डी. जे. ०१ देशपांडे मॅडम यांनी सदर गुन्हयात कलम ३०२, ३०७, ३४ भादवि मध्ये आरोपी क्र.१ ते ३ यांना आजीवन कारावास व प्रत्येकी ५०००/ रू दंड., दंड न भरल्यास ०५ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खुळे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पो.अं. विकास वाटकर यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर